# ३

# किडलेलीं माणसं

- गंगाधर गाडगीळ

लेखक परिचय :-

**गंगाधर गोपाळ गाडगीळ (१९२३-२००८) :-**

मराठी नवकथेचे प्रवर्तक म्हणून ओळखले जातात. १९४० पासून कथा लेखनाला सुरूवात. 'प्रिया आणि मांजर', ही त्यांची पहिली कथा १९४० ला प्रकाशीत झाली. मानसचित्र "कडू आणि गोड", 'तलावातले चांदणे', 'ऊन आणि पाऊस', कबुतरे, वर्षा, खुणावणाऱ्या चांदण्या, बंडूचं गपचूप, आठवण, गुणाकार, काजवा, पाळणा, खाली उतरलेले ाकाश, श्रावण, ओले उन्हं, वेगळे जग, सोंनेरी कवडसे, असे २५ कथा संगह प्रकाशित झाले. अनेक कथांची भारतीय व इंग्रजी भाषेत भाषांतरे.

कांदबरी, नाटक, विनोदी लेख आणि प्रवास वर्णनपर लेखन प्रकाशित, खडक आणि पाणी. साहित्याचे मानदंड, पाण्यावरची अक्षरे हे समीक्षा लेखन' गोपुराच्या प्रदेशात, सातासमूद्रापलीकडे, मुंबई आणि मुंबईकर ही प्रवासवर्णने. १९८० साली रायपूर येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संम्मेलनाचे ते अध्यक्ष होते.

नवकथाकार गंगाधर गाडगीळांनी लघुकथेचे सर्व संकेत झुगारून देत आशय विषय, निवेदन भाषा यातून कथेत मूलगामी परिवर्तने घडवून

आणली.उपरोधिक शैलीतून त्यांची कथा रूप घेते.

प्रस्तूत कथा "किडलेली माणसं" या कथेतून चाळीतील मध्यमवर्गीय पोकळ संस्कृतीचे दर्शन मिस्किलपणे व औपरोधिकपणे घडविले आहे. मध्यमवर्गीय शुद्रपणाची जाणीव कथा करून देते. माणसांच्या स्वभावाचे विविध कंगोरे अप्रतिमपणे रेखाटन मध्यवर्गीय माणसांची किडलेली अंतर्बाह्य मानसिकता दृष्ट्यात्मक चित्रातून उभी करण्यात लेखकाला यश आले आहे.

**प्रश्न १ :- 'किडलेली माणसे' या कथेच्या आधारे मध्यमवर्गीय चाळ संस्कृतीचे वेगवेगळेपण स्पष्ट करा?**

**किंवा**

**'किडलेली माणसे' या कथेतून लेखकाने मध्यमवर्गीय संस्कृतीचे दर्शन कसे घडविले ते सांगा?**

**उत्तर :-**

गंगाधर गाडगीळ नवकथेचे प्रवर्तक म्हणून ओळखले जातात. गाडगीळांनी कथेला कथेचे रूप म्हणून न ठेवता मध्यमवर्गीय संस्कृतीचे दर्शन घडविणारी ही कथा आहे. महानगरीय संस्कृतीतल्या चाळकरी जीवनाचा छेद घेणे तेच तिचे प्रयोजन आहे.

पेरूवाडातील खुरमुट्यांची चाळ म्हणजे महाराष्ट्रातील मध्यम वर्गीय संस्कृतीचा सुपीक मळा होय. त्या प्रतापशाली नोकरीबादर राष्ट्राचा शिवनेरी! सनातन संसारधर्माचे परमपवित्र क्षेत्रस्थान! पन्नास रूपयापासून दीडशे रूपयापर्यत वाढत जाणाऱ्या सामाजिक मानमान्यतेच्या तेथे अनेक श्रेणी होत्या. त्यातही प्रत्येक श्रेणी म्हणजे एक स्वतंत्र जात होती आणि जाती-जातीत रोटी-बेटी व्यवहारात बिलकूल मज्जाव होता. साहेबांची मर्जी आणि पगारवाढ हे तेथील पुरूषांचे जीविताचे केंद्रबिंदू होते. आणि

नवऱ्यांचा पगार व स्वतःचे सौंदर्य ही प्रत्येक बाईच्या योग्यतेची मापटी होती. नोकी मिळवायची, लग्न करायचे आणि मुलांची शिक्षणं करून पेन्शन घ्यायची असे या संसारधर्माचे चार आश्रम होते. आणि विमा उतरविणे हे एक आवश्यक धर्मकृत्य होते.

साखर आणि रॉकेल हे त्या संस्कृतीचे जळते प्रश्न होते. साहित्यिक मेळावे आणि गणपती उत्सव हे त्या वर्गाचे सामाजिक सोहळे होते. प्रीतिविवाह या त्यांच्या अद्‌भूत कथा होत्या. दारिद्र्य आणि संकुचितपणा हा त्यांचा पिढ्यानपिढ्या चालत आलेला वारसा होता.

ही मध्यमवर्गीय चाळ आपली स्वयंकेंद्रित मनोवृत्ती रेसभरही न बदलता वारसा घेऊन चालत आलेली होती. अशा या खुरमुट्यांच्या चाळीचे वर्णन लेखक करतात. मुंबईतील ही चाळ शांत दिसत असली तरी प्रसंग पडल्यास ती आपले गुणधर्म दाखविल्याशिवाय राहत नसे.

एकदा समोर रस्त्यावर मवाली शांतपणे एका मुसलमानाचे पादत्रानाचे दुकान फोडीत होते. त्यांच्यातल्या एकजणाने कुलूप फोडलें, एकाने हिसक्यासरशी दार उघडले आणि एकाने काठीने काचा फोडल्या. याचा आवाज झाल्याने चाळीतील लोक दचकून त्या घटनेचे दृश्य पाहू लागले. ते दृश्य पाहताच दामू ओरडला, 'अरे, अरे ! ते पहा मवाली दुकान फोडत आहेत! त्या सरशी चाळीतील सर्व मंडळी पाहू लागली जेथून ते दृश्य सर्वात चांगले दिसेल; अशी जागा पटकावण्याकरीता मुलांत ढकलाढाकली आणि मारामारी सुरू झाली. इतक्यात घारू अण्णा एकदम आपल्या मूलावर खेकसले, चलारे खलती व्हा आत. उनाड कुठची! आणि सगळ्यांनी पुस्तकं घ्या हातात. शामराव त्यांच्या शेजारी येऊन उभे राहिले आणि बाहेर गडबड चालली आहे. तुम्ही घरात बसा अशा आपल्या बायका-मुलांना दरडावून सांगू लागले.

शामराव दयाबुद्धीने म्हणाले 'अरे अरे काय बिचाऱ्यांचं नुकसान

करत आहेत! त्यासरंसी ऐनापुरे किंचाळले,' हेच, हेच ते चुकतं तुमचं. या मुसंड्याना काय म्हणून दया दाखवायची? ते आमच्या बायका पळवतात, पोरं बाटवतात, देवळं भ्रष्ट करतात? नाही नाही, त्याना असाच हात दाखवला पाहिजे. त्यावर, उभे असलेले घारू अण्णा म्हणाले,' कसली राजकारणाची चर्चा करताय, ऐनापूरे? आमच्या पगारात चार रुपये वाढ होईल असले एखादं राजकारण असले तर सांगा.

इतक्यात तिथे बंडोपंत बावळटपणाने चालत आले आणि चटकन मालतीबाईना धक्का देऊन पुढे गेले. रस्त्यातून जाता-येता बायकांना धक्के द्यायची बंडोपंताना चमत्कारिक सवय होती. ते इतके खुश, धूर्त आणि निर्जज्ज असत की त्यांची त्यानांच किळस वाटे. या घटनेमूळे मालतीबाई जळफळल्या. इतक्यात नेहमी बंद असणारे त्या हौशी जोडप्याच्या खोलीचे दार उघडले आणि मनोहर व लीला बाहेर आली. बाहेर चाललेल्या घटनेकडे खुर्चीवर उभे राहून ते पाहू लागले. तेंव्हा शेजारील लोक त्या घटनेकडे न पाहता यांच्याकडेच पाहू लागले. तेंव्हा लीला फणकारली, 'चहाटाळ मेले!'आणि मग दोघांनी खोलीत जाऊन परत दार बंद करून घेतले. त्यासरशी सगळ्या लोकांना हसू आले.

जोड्या दुकानातील माल रस्त्यावर फेकला जाऊ लागला. त्यामधील सगळ्या लोकांना हसू आले पळवू लागले. एका भैय्याने चांगला माल पाहून एक जोड पायात घातला आणि कांही सोबत घेऊन गेला. त्या सरशी उभ्या असलेल्या चाळीतील लोकांची चुळबुळ सुरू झाली. आणि प्रत्येकाला जोड उचलण्याची इच्छा होऊ लागली. आपल्या मुलाने त्यातले जोड आणावेत; असे उभ्या असलेल्यापैकी बऱ्याच मुलांच्या आयांना वाटू लागले. दामूने जोड आणले, परंतु मधू आणण्यास तयार होईना. एवढयात पोलीस येतात आणि लोक धावू लागतात.

"किडलेली माणसे" कथेतून मध्यमवर्गीय माणसाच्या आणि प्रवृत्तीचे

चित्रण लेखक करतात. आत्मकेंद्रित जीवन जगणारी माणसे मानवी मुल्ये तुडवून संकुचित जगात आपल्या इच्छा पूर्ण करून त्यामधून आनंद मिळविण्याचा प्रयत्न करीत होते. दुसऱ्याविषयी आदरभाव नाही, इतरापेक्षा वेगळे पणाची भावना ठेवून जगणे, वाईट का असेना पण स्वार्थीपणाला प्रोत्साहन देणे आणि आपण जगत आहोत हे योग्य आहे असे समजून याच संकुचित जगात खुरमुट्यांच्या जातीतील माणसं नांदताना दिसतात. किडलेल्या मनोवृत्तीची माणसे ही प्रवृत्ती घेऊन जीवन जगतात याचे चित्रण लेखक करतात.

**प्रश्न २ :- 'किडलेली माणसे' या नवकथेचे आशयसूत्र थोडक्यात लिहा?**

**उत्तर :-**

'किडलेली माणसे', हे गंगाधर गाडगीळ, यांची नवकथा मराठी कथेच्या पारंपरिक संकेताना छेदणारी कथा आहे. विशिष्ट असे कथानक या कथेला नाही. मुंबईतील पेरूवाडी मधील खुटमुयांच्या मध्यमवर्गीय संस्कृतीतील चाळीमधील ही कथा आकारास येते. रविवारी दुपारी सुट्टीच्या दिवशी चाळीतील सगळे मध्यमवर्गीय आपापल्या सुख-दुःखात व कोणत्या विषयात समाधानी होते. मुंबईत जातीय दंग्याचा उग्रज्वाला भडकल्या होत्या, तरी त्याचे त्यांना घेणे-देणे नव्हते. त्याबद्दल त्यांना कांहीच वाटत नव्हते. दारिद्र्य आणि संकुचितपणा हा येथील चाळीचा पिढ्यानपिढ्या आलेला वारसा होता. सामाजिक राजकीय, आर्थिक प्रश्नांविषयी त्यांची मनोवृत्ती बोथट बनलेली होती. स्वंय केंद्रित वृत्तीमूळे ते आपापल्या पेशामध्येच रममाण होते.

मुंबईत दंगलीच्या ज्वाला भडकलेल्या असताना या चाळीतील मंडळीनी केवळ बघ्याची भूमिका स्वीकारली होती. रस्त्यावरील दुकाने फोडताना पाहून त्या चाळीतील किडलेल्या मनोवृत्तीच्या लोकांना एक

एक प्रकारे आनंदच झाला होता. या दंगलीमध्ये स्वार्थ साधण्याची संधी सोडली नाही. लूट चालू असताना या चाळीतील कांही लोकांनी चप्पल, बूट यांची लूट करीत आपल्या किडलेल्या मनोवृत्तीचे दर्शन घडविले.या दंगलीमध्ये सापडलेल्या म्हातारीबद्दल कोणालाही सहानूभूती वाटली नाही. कांही लोकांना या म्हातारीचे हाल दिसत होते पण स्वार्थापलिकडे विचार न करणारी मंडळी तिला वाचवायला पुढे येत नहीत या दंगलीतील वाहत्या गंगेत हात धुवून घेत असताना मवाल्याने दामूच्या थोबाडीत मारली तो आगतिकच होता.

सर्वत्र लुटातूट, दंगल चालली असताना खुटमट्यांच्या चाळीतील मंडळी आपापल्या घराबाहेर पडली नाही. केवळ बघ्याची भूमिका त्यांनी स्वीकारली होती. नटव्या मालतीबाई आपल्या बावळट नवऱ्यावर खेकसत होती. घारू अण्णांचा पत्यांचा डाव सूरू होता. तिरळे बंडुपंत खिडकीशी उभे राहून आपल्या चाळीतील सुंदर बाईकडे पहात होते. आगतिक श्यामराव दारात बसून जुन्या छत्रीशी ठोकठाक करीत आहे. टाळकुटे गजागळ तेणापुरे हिंन्दू महासभेच्या राजकारणावर किरट्या आवाजात चर्चा करत होते. तर हौशी, लीला मनोहर या नवविवाहीत दांपत्याच्या खोलचे दार बंद होते. खुटमुट्यांची मध्यमवर्गीय चाळ बाहेर जातीय दंगलीचा भडका उडालेला असताना स्वतःचा मनोविश्वास दंग असलेले दिसतात.

**प्रश्न ३ :- 'किडलेली माणसे' या कथेची निवेदन शैली थोडक्यात लिहा?**
**उत्तर :-**

'किडलेली माणसे'या कथेमध्ये गंगाधर गाडगीळ यांनी त्रयस्थ निवेदनपद्धतीचा वापर केला आहे. लेखक त्रयस्थपणे घडलेल्या घटनांचे कथेमध्ये निवेदन करीत आहेत. त्यांची निवेदनशैली चित्ररूप स्वरूपाची

आहे. त्यामधून प्रत्यक्ष घटना-प्रसंग व व्यक्तिरेखा दृश्य स्वरूपात आपणासमोर उभ्या राहतात. नटव्या मालतीबाईंना धक्का दिल्यानंतर बंडोपंत व मालतीबाई यांच्या दोहोंच्या मनातील विकृतीही त्रयस्थपणे लेखक मांडतो. बंद दाराच्या फटीतून इतरांच्या घरात डोकावणारा दामू खुर्चीवर उभे राहून बायकोला दुटीची कॉमेंट्री सांगणारा मनोहर शामरावांच्या बगलेतून मान काढून डोकावणारे ऐनापूरे साक्षात आपणासमोर उभे करण्याचे सामर्थ्य त्यांच्या निवेदनशैलीत आहे. त्यांच्या चित्रमयी निवेदनशैलीला उपरोधाची धार प्राप्त झाल्यामूळे विविध व्यक्तिरेखांची किडलेली मनोवृत्ती नेमकेपणाने दिसून येते. उपरोधामुळे वास्तवाचे दर्शन अधिक परिणामकारकपणे घडते.

मध्यमवर्गीय संस्कृतीचा पोकळपणा व बेगडीपणा, हरवत चाललेलीमुल्ये, किडलेली मानसिकता यांचे अत्यंत प्रत्ययकारी दर्शन या निवेदनशैलीमधून घडते. पात्रांचे स्वभावविशेष त्यांच्या कृती-उक्तीमधून व विशिष्ट लकबीमधून निवेदनाच्या माध्यमातून दर्शवितात. सुक्ष्म निरीक्षण शक्तीमूळे निवेदनशैलीस वास्तवाचे परिणाम लाभलेले आहे. तिरळे बंडोपंत नटव्या मालतीबाई, हौशी नवविवाहीत दांपत्य, लीला-मनोहर, घारू अण्णांचा पत्यांचा व खिदळणारा अड्डा अशा मोजक्या विशेषणांमधून कथेतील पात्रांचे स्वभाव विशेष गाडगीळ व्यक्त करतात. हिंदूच्या मनातील मुसलमानांविषयीचा चीड व तेढ 'मुसंड्या' या विशेषणातून व्यक्त होते.